# मुंबई विद्यापीठ

REG/ICC/2019-20/35

**परीपत्रक**

विषय : दिनांक १४ एप्रिल, २०२० पर्यंत अंतरिम उन्हाळी सुट्टी (Interim Summer Vacation) बाबत

महोदय/महोदया,

देशामध्ये कोरोना विषाणूचा वाढता प्रार्दुभाव व त्या अनुषंगाने होणारे संक्रमण लक्षात घेता शासनाने दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत लॉकडाउन (Lockdown) घोषित केले होते व त्या अनुषंगाने विद्यापीठाने वेळोवेळी परिपत्रकांद्वारे सर्व संबंधिताना कळविले देखिल होते. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेवून शासनाने दिनांक १४ एप्रिल, २०२० पर्यंत लॉकडाउन (Lockdown) घोषित केले आहे. तद्नुषंगाने मुंबई विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य/मान्यता प्राप्त संस्थाचे संचालक तसेच संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व सर्व विद्यार्थ्यांना याद्वारे सुचित करण्यात येते की दिनांक ०१/०४/२०२० ते १४/०४/२०२० हा काळ विद्यापीठाने अंतरिम उन्हाळी सुट्टी म्हणून घोषित केला आहे.

उपरोक्त कालावधी जरी अंतरिम सुट्टीचा असला तरी उद्भवलेल्या परिस्थितीमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित जोपासण्याच्या दृष्टीने सर्व शिक्षकांनी या कालावधी दरम्यान विद्यार्थ्यांना ऑनलाइन (online) पध्दतीने अध्यापनाचे कार्य सुरु ठेवणे अपेक्षित आहे. दरम्यानच्या काळात संलग्नित महाविद्यालयातील/मान्यता प्राप्त संस्थेतील शिक्षकांच्या अत्यावश्यक सेवांची आवश्यकता महाविद्यालयास /मान्यता प्राप्त संस्थाना भासल्यास त्यानुसार त्यांनी आपल्या सेवा बहाल कराव्यात.

अंतरिम उन्हाळी सुट्टीच्या कालावधीमध्ये संलग्नित महाविद्यालयातील /मान्यता प्राप्त संस्थांमधील ज्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सुट्टी लागू आहे (Vacational Non-Teaching Staff) त्यांना महाविद्यालयाने /मान्यता प्राप्त संस्थानी आवश्यकतेनुसार बोलविल्यास त्यांनी आपल्या सेवा महाविद्यालयास / मान्यता प्राप्त संस्थाना प्रदान कराव्यात. उर्वरित शिक्षकेत्तर (Non Vacational Non-Teaching Staff) कर्मचाऱ्यांनी घरी राहून (Work from Home) कार्य करावे.

या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार सर्व संबंधिताना कळविण्यात येईल.

आपत्कालीन परिस्थितीमध्ये संपर्क साधण्याच्या दृष्टीने सर्व शिक्षक, संशोधक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी स्वत:चे भ्रमणध्वनी क्रमांक, ईमेल आयडी व संपर्क पत्ता संबंधित महाविद्यालयांकडे सादर करावा.

मुंबई – ४०० ०३२ (डॉ. अजय देशमुख)
३१ मार्च २०२० कुलसचिव

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाही करीता :
प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालय/संचालक, मान्यता प्राप्त संस्था